**ठळक बातम्या**

- केंद्र सरकार देशातल्या गरीब जनतेचं स्वतःच्या घराचं स्वप्न पूर्ण करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- देशाच्या विकासाचं नेतृत्व युवकांनी स्वीकारण्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांचं छत्रपती संभाजीनगर इथं दीक्षांत समारंभात आवाहन

- शक्तीकांत दास यांची प्रधानमंत्र्यांचे प्रधान  सचिव म्हणून नियुक्ती

- महाराष्ट्रातल्या जालन्यात वाळूच्या ढिगाऱ्याखाली दबल्यानं ५ मजूरांचा तर सिंधुदुर्ग जिल्ह्यात तारकर्ली इथं दोन पर्यटकांचा समुद्रात बुडून मृत्यू

**आणि**

- मन की बात कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या देशवासियांशी संवाद साधणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातलं केंद्र सरकार देशातल्या गरीब जनतेचं स्वतःच्या घराचं स्वप्न पूर्ण करत असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. शाह यांनी आज पुण्यात झालेल्या एका कार्यक्रमात प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्याअंतर्गत लाभार्थ्यांना स्वीकृती पत्रांचं वितरण केलं त्यावेळी ते बोलत होते. हे सरकार नागरिकांचं घरांचं स्वप्न पूर्ण करण्यासोबतच, त्यांना स्वयंपाकाचा गॅस  सौर उर्जेचाही पुरवठा करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

या कार्यक्रमात शहा यांच्या हस्ते राज्यातल्या २० लाख लाभार्थ्यांना स्वीकृती पत्र आणि १० लाख लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्याची रक्कम वितरित केली

गेली. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवारही उपस्थित होते.

<><><><>

सहकार क्षेत्राचा विकास झाल्याशिवाय देशाला २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनवण्याचं तसंच २०२७ पर्यंत अर्थव्यवस्थेला ५ ट्रिलीयन डॉलरची अर्थव्यवस्था बनवण्याचा संकल्प पूर्ण होऊ शकणार नाही असं केंद्रीय गृह तसंच सहकार मंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. पुणे इथं जनता सहकारी बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात बोलत होते. सहकारी संस्थांच्या केंद्रीय निबंधक सोसायटीचं देशातील पहिलं क्षेत्रीय कार्यालय पुण्यात सुरू करण्यात येणार आहे, त्याचप्रमाणं देशभरातील सहकारी बँकांना सहकार्य करुन आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी एक संघटना स्थापन करण्यात आल्याची माहिती त्यांनी या कार्यक्रमात दिली.

<><><><>

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली आज पुण्यात गृह मंत्रालयाच्या पश्चिम विभागीय परिषदेची २७ वी बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, दादरा नगर हवेली आणि दीव दमणचे प्रशासक प्रफुल पटेल आणि या क्षेत्रातल्या राज्यांचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

<><><><>

विकसित भारतासाठी नव्या संधींचा उपयोग करत देशाच्या विकासाचं नेतृत्व युवकांनी स्वीकारणं आवश्यक असल्याचं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज व्यक्त केलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६५ व्या

दीक्षांत समारंभाला ते उपस्थित होते. देशात प्रचंड क्षमता असून पायाभूत सुविधा, दळणवळण, इंटरनेट सुविधा, तंत्रज्ञानाचा उपयोग विविध क्षेत्रात करुन आपण पुढे जात असल्याचं ते म्हणाले. यावेळी उपराष्ट्रपतींच्या हस्ते पी.एम.उषा मेरु योजने अंतर्गत मंजूर चार इमारतींचं दृकश्राव्य पद्धतीने भूमिपूजन करण्यात आले. या योजनेअंतर्गत विद्यापीठाला १०० कोटीं रूपयांचं अनुदान मंजूर झालं आहे. या कार्यक्रमापूर्वी उपराष्ट्रपती जगदीप धनखड, कुलपती सी.पी.राधाकृष्णन यांच्या हस्ते नाट्यगृह परिसरात वृक्षारोपण करण्यात आलं.

**<><><><>**

‘शेती हा भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा आणि जीवनरेखा आहे’, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. चौहान यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं पुसा-कृषी विज्ञान मेळ्याचं उदघाटन झालं त्यावेळी ते बोलत होते. शेतकरी आणि शेतीशिवाय, विकसित भारताचं स्वप्न पूर्ण होऊ शकत नाही आणि म्हणूनच सरकार कृषी क्षेत्रात सातत्यानं काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान शिवराज चौहान यांनी हरियाणात गुरुकुल कुरुक्षेत्र इथल्या नैसर्गिक पद्धतीनं केलेल्या शेतीचीही पाहणी केली. शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेती पद्धतींचा अवलंब करावा असं आवाहनही त्यांनी यावेळी केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाअंतर्गत राष्ट्रीय स्तरावर समिती स्थापन करून या अभियानाला चळवळीचं स्वरूप दिलं जाईल, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><>**

रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर शक्तीकांत दास यांची प्रधानमंत्र्यांचे प्रधान सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दास हे निवृत्त आयएएस अधिकारी आहेत. शक्तिकांत दास हे प्रधानमंत्र्यांचे दुसरे प्रधान सचिव असतील. त्यांच्या नियुक्तीला

मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने मान्यता दिली होती. दास हे तामिळनाडू कॅडरचे १९८० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत.

<><><><>

शस्त्रबंदी कायम ठेवणं आणि भविष्यात गैरसमज टाळण्यावर भारत आणि पाकिस्तान यांच्यात सहमती झाली आहे. जम्मू - काश्मिरातल्या पूंछमध्ये दोन्ही देशांच्या ब्रिगेड कमांडरच्या बैठकीत ही चर्चा झाली. सुमारे ४ वर्षांनंतर अशा प्रकारची बैठक झाली. नुकतीच झालेली चकमक आणि ताबारेषेवर आढळून आलेल्या बॉम्बची पार्श्वभूमी या बैठकीला होती. दोन्ही देशातला तणाव कमी करण्यासाठी विद्यमान संपर्क यंत्रणांचा प्रभावी वापर करण्याचा निर्णयही दोन्ही देशांनी घेतला.

<><><><>

उत्तराखंड विधानसभेनं राज्यात अनियंत्रित  जमीन खरेदी-विक्रीवर  नियंत्रण आणण्यासाठी कायदा संमत केला आहे. यामुळे राज्यांतल्या अनियंत्रित जमीन व्यवहारांचं नियमन केलं जाणार आहे.

<><><><>

महाराष्ट्रातल्या जालना जिल्ह्यातल्या जाफराबाद तालुक्यातल्या पासोडी इथं आज पहाटेच्या सुमारास पाच मजुरांचा मृत्यू झाला. पासोडी रस्त्यावरच्या पुलाच्या बांधकामासाठी हे मजूर आले होते आणि पत्र्याची शेड करून राहत होते. अवैध वाळू वाहतुकीच्या टिप्पर चालकानं घाईनं टिप्पर रिकामा करताना झोपलेल्या मजुरांना पाहिलं नाही, आणि त्यांच्यावर वाळू ओतली. त्यामुळे ही घटना घडली. वाळूच्या ढिगाऱ्याखालून गावकऱ्यांनी एका लहान मुलीला सुखरूप  बाहेर काढलं असल्याचं वृत्त आहे. पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीनं जेसीबीच्या सहायानं वाळू बाजूला घेतली. त्यानंतर मृतदेह पुढच्या तपासणीसाठी पाठवले असून या प्रकरणी

कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती जालन्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी दिली.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात तारकर्ली इथं दोन पर्यटकांचा समुद्रात बुडून मृत्यू झाला. तर एकाची प्रकृती गंभीर आहे. त्याच्यावर मालवण ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पुण्याहून आलेले हे तीन जण आज सकाळी तारकर्ली समुद्रात पोहण्यासाठी उतरले होते. त्यांना बचाव पथकानं बाहेर काढून रुग्णालयात दाखल केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीवरच्या 'मन की बात' कार्यक्रमात देश-विदेशातल्या जनतेशी आपले विचार मांडणार आहेत. दर महिन्यात शेवटच्या रविवारी प्रसारित होणाऱ्या या कार्यक्रमाचा हा ११९ वा भाग असेल. आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर, NEWS ON AIR वेबसाईट आणि मोबाईल ॲप वर देखील हा कार्यक्रम प्रसारित केला जाणार आहे. याशिवाय आकाशवाणी न्यूज, डीडी न्यूज, प्रधानमंत्री कार्यालय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवर थेट प्रक्षेपण केलं जाईल. रात्री ८ वाजता या कार्यक्रमाचा मराठी अनुवाद आकाशवाणीवरुन प्रसारित होईल.

<><><><><>

नवी दिल्लीत सुरू असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात आज दुसऱ्या दिवशी वाचक आणि साहित्य रसिकांनी मोठी गर्दी केली होती. तालकटोरा स्टेडियमवर छत्रपती शिवाजी महाराज नगरी इथं भरलेल्या या संमेलनात आज विविध विषयांवर परिसंवाद रंगले.

विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी संमेलनस्थळी हजेरी लावली.

<><><><><>

१९ व्या विद्रोही साहित्य संमेलनाचं आज छत्रपती संभाजीनगर इथं उद्घाटन झालं संमेलनाचे उद्घाटक कंवल भारती यांनी या संमेलनाला शुभेच्छा दिल्या. संमेलनाध्यक्ष अशोक राणा यांनी छत्रपती संभाजीनगरात भरलेल्या या संमेलाचं अध्यक्षपद भुषवतांना आनंद होत असल्याची भावना व्यक्त केली.

<><><><><>

प्रसिद्ध ब्रिटिश- भारतीय लेखक सलमान रश्दी यांच्यावर चाकूनं हल्ला करणाऱ्या हादी मतारला न्यूयॉर्क न्यायालयानं दोषी ठरवलं आहे. २३ एप्रिल रोजी न्यायालय मतारला शिक्षा सुनावणार असून त्याला ३० वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो. ऑगस्ट २०२२ मध्ये न्यू यॉर्कमध्ये एका कार्यक्रमा दरम्यान हा हल्ला झाला होता. या हल्ल्यात रश्दी गंभीर जखमी झाले होते.

<><><><><>

देशामध्ये संविधानाने राजकीय समानता आणली असली तरी सामाजिक आणि आर्थिक समानता येणं आवश्यक आहे, असं प्रतिपादन सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती भूषण गवई यांनी केलं. वाशिम इथं विधी सेवा आणि शासकीय योजनांच्या महामेळाव्याचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालय, नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती, वाशिम जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विभागांतील सदस्य उपस्थित होते. यावेळी जिल्हा प्रशासनातल्या विविध विभागामार्फत योजनांचा लाभ घेतलेल्या लाभार्थ्यांना प्रमाणपत्र धनादेशांचं वाटप करण्यात आलं.

<><><><><>

चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेत आज ब गटात, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंड यांच्यात लाहोर इथं सुरू असलेल्या सामन्यात, इंग्लंडनं ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी ३५२ धावांचं आव्हान ठेवलं आहे. या सामन्यात ऑस्ट्रेलियानं

नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. त्यानंतर इंग्लंडचे दोन गडी झटपट बाद झाले, मात्र बेन डकेट आणि ज्यो रुट यांनी तिसऱ्या गड्यासाठी १५८ धावांची भागिदारी केल्यानं, इंग्लंडनं निर्धारीत ५० षटकांत ८ बाद ३५१ धावा केल्या. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातली ही आजवरची सर्वोच्च धावसंख्या आहे. इंग्लंडच्या वतीनं डकेट यानं सर्वाधिक १६५, तर रुट यानं ६८ धावा केल्या.

**//<><><><><>//**